


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २६६ ●गुरूवार, दि.२५ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# ऐन निवडणुकीत राज्य मंत्रिमंडळाचे सर्वात ४ मोठे निर्णय




## चौथ्या निर्णयाने सगळेच अवाक्!

**मुंबई । प्रतिनिधी**

सध्या राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. एकाच वेळी राज्यभरात २९ महानगरपालिकांच्या निवडणुका होत असल्यामुळे पक्षांतराचे वारे जोमात वाहू लागले आहे. सोबतच राज्यातील प्रमुख राजकीय पक्ष सोईच्या पक्षासोबत युती आणि आघाडी करत आहेत. काहीही झालं तरी महापालिका निवडणुकीत आपलीच सरशी झाली पाहिजे, हाच एकमेव उद्देश समोर ठेवून राजकीय रणनीती आखली जात आहे. असे असतानाच राज्य मंत्रिमंडळाची (२४ डिसेंबर) महत्त्वाची बैठक झाली आहे. या बैठकीत एकूण चार मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. विशेष म्हणजे यातील एक निर्णय हा नुकतेच पार पडलेल्या नगपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसंदर्भात आहे. या निवडणुकीत महायुतीने चांगली कामगिरी केली. असे असताना आता हा निर्णय समोर आला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाची सगळीकडे चर्चा होत आहे.

आपल्या राज्य सरकारनं आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेले काही महत्त्वपूर्ण निर्णय: निर्णय क्रमांक १- आज पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ग्राम, तालुका व जिल्हा प्रशासन सक्षम करण्यासाठी जिल्हा कर्मयोगी २.० व सरपंच संवाद कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत हा निर्णय घेण्यात आला. ▶ उर्वरित पान २ वर

# ठाकरे बंधू अखेर एकत्र; शिवसेना-मनसे युतीची ऐतिहासिक घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात दीर्घकाळ चर्चेत असलेली शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती अखेर प्रत्यक्षात उतरली असून, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज संयुक्तपणे या राजकीय युतीची अधिकृत घोषणा केली. महाराष्ट्र ज्या क्षणाची वाट पाहत होता, तो क्षण आज आला आहे, असे स्पष्ट शब्दांत राज ठाकरे यांनी यावेळी सांगत, मराठी माणसाच्या हितासाठी दोन्ही ठाकरे



एकत्र आल्याचे जाहीर केले. या ऐतिहासिक निर्णयामागील भूमिका स्पष्ट करताना राज ठाकरे म्हणाले की, कोणतेही मतभेद, वाद किंवा भांडण यापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. याच विचारातून एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू झाली. जे काही उरले आहे, ते सर्व ▶ उर्वरित पान २ वर

# अभिनेते सयाजी शिंदेंनी उभारलेल्या देवराईला भीषण आग

## अनेक झाडे आगीत भस्मसात ;आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न

**बीड । प्रतिनिधी**

अभिनेते सयाजी शिंदेंनी उभारलेल्या देवराईला आग लागली आहे. बीडच्या पालवणजवळील देवराईला अचानक आग लागल्यामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. एकाएकी इतक्या झाडांना आग कशी लागली? असा प्रश्न विचारला जात आहे. जगातील पहिले वृक्ष संमेलन बीडच्या सह्याद्री देवराई येथे झालं होतं. या आगीत अचानक हजारो झाडांना आग लागल्यामुळे खूप नुकसान झालं आहे.

**अभिनेते सयाजी शिंदे यांनी पर्यावरणाचे रक्षण आणि वृक्षसंवर्धनासाठी 'सह्याद्री देवराई' नावाची संस्था स्थापन केली आहे. यामधील बीड येथील देवराईला भीषण आग लागली**

देवराई कशी सुरु झाली?

अभिनेते सयाजी शिंदे यांनी पर्यावरणाचे रक्षण आणि वृक्षसंवर्धनासाठी 'सह्याद्री देवराई' नावाची संस्था स्थापन केली आहे. या उपक्रमांतर्गत त्यांनी महाराष्ट्रात विविध ठिकाणी देवराया विकसित केल्या आहेत, ज्यामध्ये बीड जिल्ह्यातील पालवन येथील देवराई अत्यंत प्रसिद्ध आहे.

सह्याद्री देवराई आणि संबंधित आग लागण्याच्या घटनांची माहिती समोर आली आहे. देशी वृक्षांची लागवड, संवर्धन आणि जैवविविधतेचे रक्षण करणे. सयाजी शिंदे यांनी आतापर्यंत राज्याच्या विविध भागात १० लाखांहून अधिक झाडे लावली असून अनेक ठिकाणी देवरायांची निर्मिती केली आहे बीडमधील देवराईत जगातील पहिले 'वृक्ष संमेलन' आयोजित करण्यात ▶ उर्वरित पान २ वर



### कष्टाने घेतलंल अत्याधुनिक हार्वेस्टर ठरलं मृत्यूचं कारण

**बीड । प्रतिनिधी**



गेवराईतालुक्यातील एक काळीज पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. शेतामध्ये ऊस कापणीचे काम सुरू असतानाच एका शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना गेवराई तालुक्यातील सुरळेगाव येथे घडली असून, या अपघातामुळे संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. सुधाकर लहुराव आरबड (वय ४८) असं या मयत शेतकऱ्याचं नाव आहे. ते कष्टाळू आणि शांत स्वभावाचे शेतकरी म्हणून परिसरात परिचित ▶ उर्वरित पान २ वर

# वक्फ बोर्डाला दिलासा ; पोर्टलवर नोंदणी साठी सहा महिने मुदत वाढ

## अध्यक्ष समीर काझी व टीमच्या प्रयत्नांना यश

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सर्व वक्फ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या मस्जिद, दरगाह, कब्रस्तान संस्था यांची 'उम्मीद पोर्टल' वर नोंदणी वक्फ न्यायाधिकरण कडून मोठा दिलासा मिळाला आहे.अंतिम मुदत ५ डिसेंबर २०२५ पयरत होती.आता निकाल दिला पासून पुढील सहा महिन्यात उरलेल्या संस्थांच्या मालमत्तांची नोंदणी करता येईल.महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी व त्यांच्या टीमचे हे मोठं यश मानले जात आहे. आतापयरत महाराष्ट्रातील बहुतांश वक्फ संस्थांनी नोंदणी पोर्टलवर झालेली नव्हती त्या मुळे या बाबत सुप्रीमकोर्टाच्या निर्णयान्वये वक्फ मंडळाने वक्फ न्यायधिकारणात धाव घेतली होती. मात्र अजूनही काही संस्था नोंदणी करण्याचे राहिलेल्या आहेत. त्यामुळे सबंधित संस्थांचे मुतवल्ली, ट्रस्टीना वेळेत नोंदणी करणे अनिवार्य राहणार ▶ उर्वरित पान २ वर

### संधीचं सोनं करा, नोंदणीसाठी पुढाकार घ्या : समीर काझी



**गेल्या पाच डिसेंम्बर २०२५ पयरत वक्फ मंडल कडून स्वत... कसोशीने प्रयत्न करण्यात आले, मात्र बहुतांश संस्थाचालक व ट्रस्टी यांनी पुढाकार घेतला नव्हता, आता न्यायधिकारणाने मुदत वाढवून दिली आहे, म्हणून संधीचं सोनं करण्याची जबाबदारी संस्थाचालक व ट्रस्टी यांची आहे.उमीद अधिनियम २०२५ च्या कला ६१ अन्वये नोंदणी न केल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल,म्हणून आता तरी जागे व्हा.नोंदणी करून घ्या असे आवाहन समीर काझी यांनी केले आहे.**

# बीडमध्ये छेडछाड करणाऱ्या टवाळखोरांचे धाबे दणाणले

## दामिनी पथकाचा वर्षभरात २२३ 'रोडरोमियां'ना दणका

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरासह जिल्ह्यात मुलींची छेड काढणाऱ्या आणि शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात टवाळकी करणाऱ्या रोडरोमियोंवर दामिनी पथकाने आता जबरदस्त प्रहार केला आहे. पीएसआय पल्लवी जाधव यांनी या पथकाची धुरा सांभाळल्यापासून टवाळखोरांविरुद्धच्या मोहिमेला मोठी गती मिळाली असून, एका वर्षात तब्बल २२३ रोडरोमियोंवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात



आली आहे. आज बीडच्या शिवाजी विद्यालय परिसरात मुलींना नाहक त्रास देणाऱ्या १३ जणांना पथकाने रंगेहाथ पकडून चांगलाच धडा शिकवला.

आजच्या कारवाईत शिवाजी विद्यालय परिसरात गस्त घालत असताना हे १३ रोडरोमिओ मुलींची छेड काढताना आढळले. दामिनी पथकाने त्यांना तातडीने ताब्यात घेऊन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात हजर केले. त्यांच्यावर मुंबई पोलीस अधिनियम ११०/११७ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. भररस्त्यात मुलींची असुरक्षितता वाढवणाऱ्या अशा विकृत प्रवृत्तींविरुद्ध पोलीस आता अधिक आक्रमक झाले असून, मुलींच्या वाटेत आडवे ▶ उर्वरित पान २ वर

# वृद्ध महीलेस लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश



**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील लाडेवडगाव येथील वृद्ध महिला पत्र्याच्या शेडमध्ये झोपलेली असताना तिच्या अंगावरील दागिने चोरून नेल्याची घटना १८ जून २०२५ रोजी घडली होती. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी या प्रकरणातील आरोपीला जेरबंद करण्यात यश मिळवले आहे.

मालनबाई तुकाराम लाड, वय ८०. रा लाडेवडगांव ता. केज या पत्राचे शेडमध्ये रात्री एकट्याच झोपलेल्या असताना अनोळखी चार चोरट्यांनी त्याच्या पत्र्याच्या शेडमध्ये प्रवेश केला. त्याच्या अंगावरील सोन्याचे दागीने कानातील फुले चोरुन घेवुन गेले होते. याप्रकरणी युसुफ वडगांव पोलीस ठाण्यात कलम ३०९ (६) भा.न्या. संहीताप्रमाणे दिनांक १८ जून २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.याप्रकरणी गुन्ह्याच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे ▶ उर्वरित पान २ वर

# गोदावरी पात्रात पोलिसांचा छापा; चार ट्रॅक्टर सह १४ लाखाचा माल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

गोदावरी पात्रात म्हाळस पिंपळगाव येथे अवैध वाळू उपसा होत असल्याची माहिती मिळताच गेवराई पोलिसांनी मारलेल्या छाप्यात चार ट्रॅक्टर सह १४ लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा केला जात आहे. म्हाळस पिंपळगांव येथे वाळू उपसा केला जात असल्याची



माहिती गेवराई पोलिसांना मिळाली. गेवराई पोलिसांनी या ठिकाणी छापा मारताच चार ते पाच ट्रॅक्टर चालक ट्रॅक्टरला पाठीमागील बाजूस केन्या लावून अवैध ▶ उर्वरित पान २ वर








*बीड नगर पालिका निवडणुकीत प्रभाग आठ मधुन निवडून आल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी मराठा संघर्ष योद्धा मनोज जारांगे पाटील यांची अंतरवली या ठिकाणी भेट घेऊन आशीर्वाद घेतले, सोबत नवनाथ प्रभाळे, परमेश्वर तळेकर सह आदी.*

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीची धुरा खा. बजरंग सोनवणे यांच्या खांद्यावर

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांनी आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या दृष्टीने संघटनात्मक तयारीला गती देण्यास सुरुवात केली असून, त्याचाच भाग म्हणून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या 'निवडणूक प्रभारी'पदी खासदार



बजरंग सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांच्या मान्यतेने जाहीर करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणूक पक्षासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, शहर व परिसरात पक्ष संघटना अधिक सक्षम करण्याची जबाबदारी खासदार सोनवणे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, नगरसेवक तसेच विविध सामाजिक घटकांशी समन्वय साधत प्रभावी निवडणूक रणनीती राबविण्याचे आव्हान ▶ उर्वरित पान २ वर



# ख्रिसमस (नाताळ) : गोठ्यात जन्मलेली आशा, मानवतेचा अनंत प्रकाश

इतिहासाच्या दीर्घ प्रवासात काही दिवस असे येतात , जे केवळ तारखांपुरते मर्यादित राहत नाहीत . ते दिवस माणसाच्या मनात उतरतात , समाजाच्या जखमांवर फुंकर घालतात आणि मानवतेला नव्याने उभे करतात . ख्रिसमस , ज्याला भारतीय मातीमध्ये प्रेमाने नाताळ म्हणतात , असा एक दिवस आहे . हा सण केवळ धर्माचा नाही , तो माणूसपणाचा आहे . गोठ्यात जन्मलेला एक बालक , ज्याच्या पाळण्यात ऐश्वर्य नव्हते , पण ज्याच्या शब्दांत सत्य होते , त्याग होता , आणि प्रेमाची अपार ताकद होती – तो म्हणजे येशू ख्रिस्त.

येशूचा जन्मच मानवतेला धक्का देणारा होता . रोमसारख्या साम्राज्याच्या वैभवाच्या छायेत , बेथलेहेमच्या एका साध्या गोठ्यात , गुरांमध्ये , गवतावर हा प्रकाश अवतरला . या जन्मानेच येशूने सांगून टाकले की महानता सोन्याच्या मुकुटात नसते , तर नम्रतेत असते . राजवाड्याऐवजी गोठा , सिंहासनाऐवजी क्रूस – ही येशूच्या जीवनाची चौकट होती .

येशूचे बालपण शांत होते , पण त्याचे विचार लहान वयातच खोल होते .



किशोरावस्थेतच त्यांनी धर्मगुरूंना प्रश्न विचारले , परंपरांना विवेकाच्या कसोटीवर तपासले . तीसाव्या वर्षी त्यांनी समाजात उघडपणे उपदेश सुरू केला . त्यांचे शब्द तलवारीसारखे धारदार नव्हते , तर जखमांवर औषध लावणारे होते . शेजाऱ्यावर प्रेम करा , द्वेषाला द्वेषाने उत्तर देऊ नका , क्षमा करा – हे शब्द त्या काळातील सत्ताधाऱ्यांसाठी धोक्याचे होते , पण सामान्य माणसासाठी आशेचे दीप होते.

येशूच्या जीवनातील घटना केवळ चमत्कार म्हणून पाहिल्या जात नाहीत , तर त्या मानवी मूल्यांची रूपके आहेत . त्यांनी आंधळ्याला दृष्टी दिली , पण त्याहून मोठा चमत्कार म्हणजे त्यांनी समाजाला अंधश्रद्धेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला . त्यांनी उपाशी लोकांना अन्न दिले , पण त्याहून मोठे म्हणजे त्यांनी सांगितले की संपत्ती साठवण्यापेक्षा वाटण्यात धन्यता आहे . त्यांनी पापी समजल्या गेलेल्या स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारले , कारण त्यांच्या दृष्टीने पापापेक्षा माणूस मोठा होता .

येशूने गरीब , आजारी , बहिष्कृत , पापी ठरवलेले लोक यांना जवळ घेतले . समाजाने दूर लोटलेल्यांना त्यांनी कवटाळले . त्यांच्या दृष्टीने देव मंदिरात बंद नव्हता ; तो माणसाच्या दुःखात , अश्रूंमध्ये आणि संघर्षात होता . म्हणूनच त्यांनी सांगितले – जेव्हा तुम्ही गरिबाला मदत करता , तेव्हा तुम्ही मला मदत करता.

येशूचे जीवन जितके करुणेने भरलेले होते , तितकेच त्याचे शेवटचे दिवस वेदनांनी भरलेले होते . सत्य बोलल्याची , अन्यायाविरुद्ध उभे राहिल्याची किंमत त्यांना क्रूसावर चढून मोजावी लागली . काट्यांचा मुकुट , लोकांची थट्टा , शिष्यांची भीती , एकाकीपण – हे सारे त्यांनी सहन केले . पण क्रूसावरही त्यांनी द्वेष केला नाही . हे पित्या , त्यांना क्षमा कर – हे शब्द मानवतेच्या इतिहासातील सर्वात महान क्षणांपैकी एक आहेत .

क्रूसावरचा मृत्यू हा शेवट नव्हता . तो नव्या विचारांची सुरुवात होती . येशूचा संदेश त्यांच्या मृत्यूनंतरही जिवंत राहिला . कारण तो संदेश धर्माचा नव्हता , तो माणूस म्हणून जगण्याचा होता . म्हणूनच ख्रिसमस साजरा करताना केवळ जन्माची आठवण केली जात नाही , तर त्या जीवनाचा अर्थ समजून घेतला जातो .भारतीय समाजात नाताळाला एक वेगळीच ऊब आहे . भारत हा विविधतेतील एकतेचा देश आहे . येथे ख्रिसमस हा फक्त ख्रिश्चन समाजाचा सण राहिलेला नाही . चर्चमधील घंटानाद ऐकायला सर्व धर्मांचे लोक जातात . घराघरांत तारे लावले जातात . केक कापण्यापेक्षा माणसांमधील गोडवा जास्त महत्त्वाचा मानला जातो . ही भारतीय संस्कृतीची खरी ताकद आहे.

ग्रामीण भारतात नाताळ आणखी जिवंत वाटतो . साध्या घरांमध्येही दिवा लावला जातो . गरिबालाही या दिवशी विसरले जात नाही . एखादा घास कमी खाल्ला जातो , पण शेजाऱ्याला दिला जातो . हीच येशूच्या शिकवणीची खरी अंमलबजावणी आहे.

आजच्या काळात ख्रिसमसचा संदेश अधिकच महत्त्वाचा झाला आहे . समाज ताणलेला आहे . संवाद कमी झाला आहे . माणूस माणसापासून दूर गेला आहे . धर्म , जात , भाषा , विचार यावरून भिंती उभ्या राहत आहेत . अशा वेळी येशू सांगतात – भिंती नव्हे , पूल बांधा . द्वेष नव्हे , प्रेम पेरा . सूड नव्हे , क्षमा ठेवा .

ख्रिसमस म्हणजे केवळ सण नाही . तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे . आपण समाजाला काय देतो आहोत , हा प्रश्न विचारण्याचा दिवस आहे . आपण कमजोरांच्या बाजूने उभे राहतो का , अन्याय पाहून गप्प बसतो का , गरिबाला माणूस म्हणून पाहतो का – हे प्रश्न नाताळ आपल्यासमोर ठेवतो .

येशू ख्रिस्तांचे जीवन सांगते की माणूस मोठा होतो तो संपत्तीने नाही , तर संवेदनांनी . सत्ता टिकते ती दडपशाहीने नाही , तर न्यायाने . समाज उभा राहतो तो हिंसेने नाही , तर करुणेने . म्हणूनच नाताळ हा आनंदाचा सण असला तरी तो जबाबदारीची आठवण करून देणारा दिवस आहे . दिवे लावण्याबरोबरच मनातील अंधार दूर करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे . भेटवस्तू देण्याबरोबरच वेळ , प्रेम आणि आधार देण्याचा दिवस आहे .

ख्रिसमस आपल्याला सांगतो – अंधार कितीही दाट असला , तरी एक छोटासा दिवाही पुरेसा असतो . आणि तो दिवा प्रत्येकाच्या हातात आहे .



येशू ख्रिस्तांच्या जीवनाचा हाच शाश्वत संदेश आहे – माणूसपण जपा . प्रेम वाटा . मानवतेचा प्रकाश विझू देऊ नका .

– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार , बीड

◆ पान ९ वरून पुढे...

## ऐन निवडणुकीत....

निर्णय क्रमांक २-राज्यातील जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य विभागामध्ये कार्यरत व सेवानिवृत्त झालेल्या बंधपत्रित आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित होणार असल्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलाआहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी एक एकर जागा

निर्णय क्रमांक ३- धाराशिव शहरात साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्यासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागाची एक एकर जागा निश्चित करण्यात आली आहे. तसा निर्णय राज्याच्या महसूल विभागाअंतर्गत घेण्यात आला आहे.

अध्यक्षास सदस्यत्व मिळणार, मतदानही करता येणार

निर्णय क्रमांक ४- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व मिळणार. त्याला आता मताचाही अधिकार असेल. अधिनियमातील सुधारणेसाठी अध्यादेश काढला जाणार आहे. तसा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

## ठाकरे बंधू...

जाहीर सभेत मांडू. सध्या निवडणूक लढवणाऱ्या सर्व उमेदवारांना उमेदवारी दिली जाईल. उमेदवारी अर्ज भरण्याची वेळ लवकरच कळवली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज ठाकरे यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर उपरोधिक टीकाही केली. राज्यात लहान मुलांचे अपहरण करणाऱ्या टोळ्यांची चर्चा सुरू असताना, त्यात आणखी दोन टोळ्या वाढल्या असून त्या राजकीय पक्षांतील असल्याचा टोला त्यांनी नाव न घेता लगावला. सत्तेच्या राजकारणात फूट पाडणाऱ्या प्रवृत्तींवर त्यांनी अप्रत्यक्षपणे टीका केली. दरम्यान, ठाकरे बंधूंच्या या घोषणेनंतर शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसेच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारला आहे. मुंबईसह राज्यभरात फटाके, ढोल-ताशे आणि घोषणाबाजी करत जल्लोष साजरा केला जात असून, अनेक ठिकाणी एकत्र येऊन कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला.

## अभिनेते सयाजी..

आले होते. ही देवराई आता एक पर्यटन स्थळ म्हणूनही ओळखली जाते. आगीच्या घटना- सयाजी शिंदे यांच्या या उपक्रमाला गेल्या काही वर्षांत आगीच्या संकटाचा सामना करावा लागला आहे: बीड (पालवन) देवराई - फेब्रुवारी २०२२: १३ फेब्रुवारी २०२२ रोजी बीड येथील पालवन येथील सह्याद्री देवराईला भीषण आग लागली होती . या आगीत सुमारे २ ते ६ एकर परिसरातील हजारो झाडे जळून खाक झाली. यामध्ये प्रामुख्याने वड, लिंबू, पिंपळ आणि चिंच यांसारख्या देशी वृक्षांचे मोठे नुकसान झाले. मार्च २०२२ मध्ये याच देवराईच्या परिसरातील डोंगराला पुन्हा आग लागली होती. ८ मार्च २०२० रोजी सयाजी शिंदे साताऱ्याकडे जात असताना पुण्याच्या कात्रज बोगद्याजवळ एका डोंगराला आग लागलेली दिसली. त्यांनी स्वतः गाडी थांबवून झाडांच्या फांद्या आणि मातीच्या सहाय्याने ही आग विझवण्यासाठी प्रयत्न केले, ज्यामुळे मोठी हानी टळली. सयाजी शिंदे यांनी या आगीच्या घटनांबद्दल खंत व्यक्त करत, या आगी नैसर्गिक नसून कोणीतरी जाणीवपूर्वक लावल्याचा संशय देखील अनेकदा व्यक्त केला आहे.

## कष्टाने घेतलंल...

होते. नेहमीप्रमाणे सोमवारी दि. २२ डिसेंबर सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास त्यांच्या शेतात ऊस तोडणीचे काम सुरू होते. आधुनिक हार्वेस्टर मशीनद्वारे ऊस कापला जात असताना, मशीनसोबत असलेल्या इन्फेटरचा अचानक जोरदार धक्का सुधाकर आरबड यांना लागला. काही कळायच्या आत ते मशीनच्या कचाट्यात आले. ही धडक इतकी भीषण होती की, आरबड यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर शेतात एकच गोंधळ उडाला होता.

## वक्फ बोर्डाला...

आहे. सर्वोच्च न्यायालयाने तारीख वाढवून देण्यास नकार दिला असला तरी वक्फ ट्रिब्युनल (वक्फ न्यायाधिकरण) मध्ये जाण्याची मुभा दिलेली आहे. उम्मीद पोर्टलवर नोंदणीसाठी मुदतवाढ मिळेल असा विश्वास महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी व्ये केला होता. राज्यातील प्रत्येक वक्फ संस्थांची नोंदणी झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असेही अध्यक्ष काझी यांनी सांगितले होते. भारतात वक्फ संस्थांच्या नोंदणीत महाराष्ट्र राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे. उम्मीद पोर्टलवर वक्फ संस्थांची नोंदणी करण्यासाठी ५ डिसेंबर २०२५पयरत मुदत देण्यात आली होती. या कालावधीत महाराष्ट्रातील बहुतांश वक्फ संस्थांनी नोंदणी केली असली तरी रेकॉर्ड उपलब्ध नसणे किंवा इतर कागदपत्रा अभावी अनेकांना नोंदणी करता आली नाही. सर्व कागदपत्र एकाच वेळी उपलब्ध करण्यासाठी अडचणी येत आहेत. त्याचबरोबर उम्मीद पोर्टल वरील तांत्रिक अडचणी देखील त्यासाठी कारणीभूत ठरू लागले आहेत. उम्मीद पोर्टल वरील नोंदणीसाठी मुदतवाढ मिळावी अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने सदरील याचिका फेटाळली मात्र वक्फ ट्रिब्युनल ( वक्फ न्यायाधिकरण) मध्ये जाण्यास मुभा दिली होती. त्यामुळे आता महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने वक्फ न्यायाधीकरणमध्ये धाव घेऊन यश मिळविले असल्याचे समीर काझी यांनी सांगितले.

## बीडमध्ये छेडछाड ...

येणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराच या कारवाईतून देण्यात आला आहे. केवळ कारवाईच नाही, तर दामिनी पथक जिल्ह्यातील विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थिनींना कायदेविषयक माहिती आणि स्वसंरक्षणाचे धडेही देत आहे. शहरात आणि तालुक्याच्या ठिकाणी जिथे मुलींची वर्दळ असते, जसे की शाळा, कॉलेजेस आणि कॉफी शॉप्स, अशा ठिकाणी हे पथक सतत गस्त घालत आहे. वर्षभरातील २२३ कारवायांमुळे मुली आणि महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होत असून, सार्वजनिक ठिकाणी छेडछाड करणाऱ्यांचे मात्र धाबे दणाणले आहेत. ही धाडसी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय पल्लवी जाधव, सहायक फौजदार मीरा रेडेकर, पोलीस हवालदार शोभा जाधव, पोलीस शिपाई गजानन चौधरी आणि योगेश निर्धार यांनी यशस्वीरीत्या केली. मुलींनी कोणतीही भीती न बाळगता त्रास देणाऱ्यांविरुद्ध तक्रार करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## वृद्ध महीलेस...

पोउपनि महेश विघ्ने यांचे पथक सदरील गुन्हयाचा समांतर तपास करीत होते. सदरील गुन्हा हा श्याम अजिनाथ शिंदे रा मांडवा ता वाशी जि.धाराशिव याने त्याचे साथीदाराचे मदतीने केल्याचे गुप्तबातमीदार व तांत्रिक विश्लेषण व्दारे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आरोपीचे मागावर होते. दरम्यान २० डिसेंबर रोजी गुप्त बातमीदारमार्फत माहीती मिळाली की, आरोपी श्याम अजिनाथ शिंदे हा केज येथील बसस्टॅन्ड वर येणार आहे. माहीती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ केज येथे जावुन बसस्थानक परीसरात सापळा लावला. आरोपी श्याम अजिनाथ शिंदे हा बसमधुन खाली उतरत असताना पथकाने गराडा घालुन त्याला पकडले, त्यास गुन्हयासंदर्भाने विचारपुस करता त्याने सदरील गुन्हा त्याचे साथीदार विशाल अजिनाथ शिंदे, रा मांडवा ता. वाशी, अमोल नाना शिंदे, रमेश नाना काळे दोन्ही रा कन्हेरवाडी, पारधी वस्ती वाशी, जि. धाराशिव यांनी मिळून केल्याचे सांगीतले. त्याच्या ताब्यातुन चोरीस गेलेले ०९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीणे हस्तगत करण्यात पोलीसांना यश आले असुन आरोपी सध्या कोठडीत आहे.हि कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, स्थानिक गुन्हे शाखेचे पीआय शिवाजी बंटेवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली युसुफ वडगाव पोलीस ठाण्याचे सपोनि मच्छिंद्र शेंडगे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार जफर पठाण, महेश जोगदंड, दिपक खांडेकर, भागवत शेलार, पोलीस अंमलदार बप्पासाहेब घोडके, चालक पोलीस हवालदार गणेश मराडे यांनी केली.

## गोदावरी पात्रात....

वाळू उपसा केला जात असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांची गाडी येत असल्याचे पाहताच तीन ट्रॅक्टर चालक यावेळी फरार झाले.तर आकाश भास्कर भिताडे वय २३ वर्षे, रा. गंगावाडी, ता. गेवराई जि. बीड या ट्रॅक्टर चालकास पकडण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांनी मारलेल्या या छाप्यात स्वराज कंपनीच्या चार ट्रॅक्टर केन्यासह असा १४ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. दरम्यान ही कारवाई पोलीस अधीक्षक नवीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उप विभागीय पोलीस अधीकारी अनिल कटके पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शना खाली सपोनि, सतीष कोटकर, पोउपनि प्रदीप आढाव, ग्रेडपोउपनि श्रीमंत उबाळे, जितेंद्र ओव्हाळ, गोरक्ष डोके यांनी केली.याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि प्रदिप सांळुके हे करीत आहेत.

## छत्रपती संभाजीनगर...

त्यांच्यासमोर असणार आहे. या नियुक्तीबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना खासदार बजरंग सोनवणे यांनी पक्षाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल समाधान व्यक्त केले. पक्षाचे राष्ट्रीय नेतृत्व, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तसेच सर्व ज्येष्ठ नेत्यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. पक्षाची विचारधारा, धोरणे आणि संघटन अधिक बळकट करत कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणार आहे. सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला यश मिळवून देण्यासाठी पूर्ण निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करणार आहे, असे सोनवणे यांनी सांगितले. दरम्यान, या नियुक्तीमुळे छत्रपती संभाजीनगर शहरातील राजकीय हालचालींना वेग येणार असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आगामी निवडणुकांसाठी सज्ज झाल्याचे संकेत मिळत आहेत. संघटन मजबूत करणे, बूथनिहाय तयारी, मतदारांशी संवाद आणि स्थानिक प्रश्नांवर आधारित प्रचार यावर भर देण्यात येणार असल्याचे पक्षाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. खा.बजरंग सोनवणे यांना निवडणुकीचा मोठा अनुभव असल्याने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## मतदारांनी घडवला...

नेते योगेश क्षीरसागर, भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह अनेक भाजप नेत्यांनी प्रभागात जाहीर सभा घेत मतदारांना विजयाचे आवाहन केले होते. प्रभाग क्र. ७ मधील मतदारांनी कोणत्याही दबावाला न जुमानता परंपरेच्या चौकटीबाहेर जाऊन नव्या नेतृत्वाला संधी देत लोकशाहीचा खरा अर्थ अधोरेखित केला आहे. काम करणाऱ्यालाच संधी हा ठाम संदेश देत मतदारांनी प्रभागाच्या राजकीय इतिहासात नवा अध्याय लिहिला आहे. या विजयामागे जगदीश गुरखुदे यांची सातत्यपूर्ण विकासकामे, सर्वसामान्यांशी असलेला थेट संवाद, संकटसमयी दिलेली मदत आणि पारदर्शक कारभाराची प्रतिमा कारणीभूत ठरली आहे. त्याचबरोबर त्यांचे बंधू परशुराम गुरखुदे, द्वारकाधीश मित्रमंडळ, भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच प्रभागातील विविध समाजघटकांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. विजयानंतर जगदीश गुरखुदे व सौ. भाग्यश्री सागर देशपांडे यांनी संयुक्तपणे भव्य रॅली काढून प्रभागातील सर्व मतदार बंधू-भगिनींचे मनापासून आभार मानले. यावेळी ते म्हणाले, मतदारांनी दाखवलेला विश्वास ही आमच्यासाठी मोठी जबाबदारी आहे. भविष्यात कोणालाही कोणतीही अडचण भासल्यास आम्ही सदैव जनतेच्या सेवेत उपलब्ध राहू. आगामी काळात प्रभाग क्र. ७ मधील सर्व प्रलंबित कामे पूर्ण करून नव्या विकासकामांना गती देण्यात येईल, नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक सक्षमपणे उपलब्ध करून दिल्या जातील आणि प्रभागाचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या निकालामुळे प्रभाग क्र. ७ मध्ये नव्या विचारांचा, नव्या नेतृत्वाचा आणि विकासाच्या नव्या पर्वाचा प्रारंभ झाला आहे, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

## दिव्यांगाच्या योजनांच्या...

स्वराज्य संस्थेमधील ५% दिव्यांग कल्याणार्थ राखीव निधी मुदतीत खर्च करण्यात यावा. व सर्व दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा. असे सर्व गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी नगर परिषद यांना निर्देश देण्यात आले. सदर बैठकीमध्ये श्री. जितीन रहमान, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी शालेय शिक्षण विभागामध्ये प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांना णऊखऊ कार्ड काढण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत असून जिल्हा परिषद अंतर्गत सर्व इमारती सुगम्य करण्याच्या अनुषंगाने सर्व विभाग प्रमुखांनी उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. शासन निर्णयानुसार सर्व ५% निधी दिव्यांगाच्या विविध योजनांवर खर्च करण्याचे निर्देश दिले. बीड जिल्ह्यामध्ये दिव्यांगाशी निगडीत जिल्हा वार्षीक योजनेमधील १% निधी मधून दिव्यांगासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी महोदयांनी सांगीतले. शिवाय दिव्यांगाच्या सामाजिक, आर्थीक व शैक्षणिक हितासाठी जिल्हास्तरावर सनियंत्रण समिती व नियोजन समिती तयार करून प्राधान्याने दिव्यांगाचे प्रश्न सोडविणार असल्याचे नमुद केले. बीड जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागातील दिव्यांगाचे सर्वेक्षण जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, बीड यांच्यामार्फत पूर्ण झाले असून उपलब्ध माहितीनुसार प्रत्येक शासकीय विभागाचा कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे. सदर आराखड्यानुसार संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्यात येणार आहे. सदर बैठकीसाठी बीड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी, सर्व मुख्याधिकारी, जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे सर्व कर्मचारी, जिल्हा शल्यचिकित्सक, अधिष्ठाता स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई व श्रीम. प्रियाराणी पाटील, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांची उपस्थिती होती.

## महेश सहकारी...

उपस्थितांसमोर मांडली जाणार आहे. या मार्गदर्शनपर कार्यक्रमात II Care Foundation व ACFI चे अधिकारी विठ्ठल भापकर हे ऊस लागवड पद्धती, सुधारित बियाणे, योग्य खत व्यवस्थापन,पाणी नियोजन, रोग व किड नियंत्रण, उत्पादन वाढीसाठी आवश्यक असलेल्या आधुनिक उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. II Care Foundation च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध शेतकरीपूरक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. यानंतर नाना ऊस तंत्रज्ञानाचे तज्ज्ञ श्री. नवनाथ गायकवाड हे आधुनिक ऊस तंत्रज्ञान,नव्या लागवड पद्धती, कमी खर्चात अधिक उत्पादन कसे मिळवावे,ऊसाची गुणवत्ता कशी सुधारावी, शाश्वत ऊस शेतीबाबत सखोल मार्गदर्शन करणार आहेत. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे मार्गदर्शन मिळणार असल्याने हा कार्यक्रम उपयुक्त ठरणार आहे. -उऋख च्या मान्यवरांच्या मनोगतातून -उऋख चे कार्य, खख उरीश र्ऋेपवरींळेप चा सहभाग,एकत्रित कामाचे धोरण, शेतकरी हितासाठी राबविण्यात येणारे उपक्रम तसेच शेतकऱ्यांना होणारे आर्थिक व तांत्रिक फायदे याविषयी माहिती दिली जाणार आहे. कार्यक्रमात स्क्रीनवरून भाग १, भाग २ व भाग ३ असे ऊस व्यवस्थापनावर आधारित व्हिडिओ सादरीकरण होणार आहे. त्यातून शेतकऱ्यांना ऊस शेतीतील आधुनिक पद्धती, प्रात्यक्षिक उदाहरणे व यशस्वी शेतकऱ्यांचे अनुभव दाखविण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष उपयोगी ठरणारी माहिती मिळणार आहे.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित शेतकरी बांधवांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे.या भव्य मार्गदर्शनपर कार्यक्रमास महेश सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील व परिसरातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कारखान्याच्या वतीने करण्यात आले आहे.

## बीड मधील ...

मुलांना आणि मुलींना शिक्षण देऊन शिक्षित केले होते. वृद्धापकाळाने मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. मागील काही दिवसांपासून त्यांची प्रकृती बरी नसल्याने त्यांना उपचारासाठी बीड शहरातील खासगी रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असतानाच बुधवार दिनांक २३ रोजी संध्याकाळी ९: ३० वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर बुधवार दि. २४ डिसेंबर रोजी दुपारी ठीक १२ वाजता देवी बाबुळगाव येथील त्यांच्या शेतात शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले. बन्सी ढोकणे यांच्या पश्चात पत्नी, चार भाऊ, भाऊजयी, दोन मुले, चार मुली, जावई, नातवंडे व पणतवंडे असा मोठा परिवार आहे. आज सकाळी ८ वाजता रक्षा सासवडचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तर दुपारी १२ वाजता त्यांच्या देवी बाभूळगाव येथील राहत्या घरी पुण्यनुमोदनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यांच्या निधनाने देवी बाबुळगाव परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ढोकणे परिवारावर कोसळलेल्या दुःखात द्वैपरिवार सहभागी आहे.

## डॉक्टरी पेशाला...

पुढील वैधकिय शिक्षण पुर्ण होई पर्यंत तलवाडा प्राथमिक अरोग्य केंद्र हे उप जिल्हा रुग्णालय होईल आशी अपेक्षा आहे व तसे पर्यत्न येथील सर्व शेत्रातील पदाधिकारी करतील मला नक्किच पुनच्छ सेवा करायला आवडेल आसे मनोगत या वेळी डॉक्टर अक्षय खरवडे साहेबांनी व्यक्त केले. उपस्थित सर्व मान्यवर व गावकऱ्यांनी पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी जि प सदस्य सुरेशराव हात्ते साहेब, तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनी निलंगेकर साहेब, बळीराम खरवडे साहेब, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर, जयदेव शिगणे, बाळु डहाळे, डॉ. पुजा शेळके, डॉ. शेख आझहर, डॉ. नितीन काकड शिवाजी साळवे, लघु नन्नवरे, महेश मरकड, कृष्णा खटके, अक्षय वाघमारे, अभिजीत चौरे, शुभम राऊत, म्हस्के, गायकवाड, दिसले मॅडम, सांगळे, घनवे, बोराडे सिस्टर, कदम, एकनाथ नाटकर, मिटकर मावशी, संजय खरात, गफ्फारभाई, गोंदीकर यांच्यासह पत्रकार बांधव व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सीमेवर देशासाठी...

अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत सोन्याचे दागिने व रोख रक्कम मिळून एक लाख रुपये लंपास केली. घरातील सर्व कुटुंबीय शेतावर कामासाठी गेले असताना, चोरट्यांनी संधी साधत घराचे कुलूप तोडले आणि बेधडकपणे घरात प्रवेश केला. जवान सीमेवर देशासाठी लढत असताना,त्यांच्या कुटुंबावर असा आघात होणे अत्यंत संतापजनक व खेदजनक आहे. देशाच्या सुरक्षेसाठी प्राणपणाने उभे राहणाऱ्या जवानांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कुणाची? असा संतप्त सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे. गावागावातील चोरीच्या घटना वाढत असताना, पोलिस यंत्रणा नेमकी काय करत आहे,असा प्रश्नही उपस्थित होत आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेतली असून तपास सुरू आहे.मात्र,चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन कडक कारवाई झाली नाही,तर नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास डळमळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## भीक मागायला ...

झोपत होती. तसेच तिला आईकडून सतत मारहाण होत होती. चाईल्ड हेल्पलाईनने बालिकेच्या प्रकाराबाबत गेवराई पोलीस स्टेशनला माहिती दिली. आईचे समुपदेशन केले. बालगृहात प्रवेशाची प्रक्रिया समजावून सांगितल्यानंतर बालिकेला बीडच्या बाल कल्याण समितीसमोर सादर केले. समुपदेशन करून बालिकेला बालगृहात ठेवण्याचा निर्णय घेतला. बालिकेला गेवराई येथील सहारा अनाथाश्रम येथे दाखल करण्यात आले.

## आष्टीतील राष्ट्रीयीकृत...

संघाने बँकेच्या वरिष्ठ व्यवस्थापनासह सर्व प्रशासकीय यंत्रणांना निवेदन देत मॅनेजरची तात्काळ बदली, आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी आणि ग्राहकांना होणारा मानसिक व आर्थिक त्रास थांबवण्याची ठाम मागणी केली आहे. या गंभीर प्रकरणाकडे दुर्लक्ष झाल्यास जनआंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# कामगार कल्याण कायद्याची अंमलबजावणी न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**



माथाडी कामगार कायदा तसेच अन्य कामगार कल्याण कायदे व योजनांची अंमलबजावणी न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करा व याबाबत दर आठवड्याला अहवाल सादर करा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाच्या जिल्हास्तरीय कृती समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. जिल्हा कामगार अधिकारी सुरेंद्रसिंग राजपूत, वखर महामंडळाचे अंकुश भाटेकर, जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग निरीक्षक के. एस. पवार, कामगार संघटनांचे प्रतिनिधी सुभाष लोमटे, शेख हारुन, संतोष तळेकर आदी उपस्थित होते. कामगारांची विविध आस्थापनांवर निवड होऊन त्यांच्या वेतनावरील लेव्ही कामगार मंडळाकडे वेळेत जमा न करणे, कामगारांच्या नियुक्त्यांसंदर्भात विविध प्रश्न, कामगारांना वेळेवर वेतन न दिल्यास दंड आकारणी करणे अशा विषयांबाबत चर्चा करण्यात आली. कामगार संघटनांनी यासंदर्भात त्यांचे प्रश्न मांडले. जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, वखार महामंडळांनीही माथाडी कायद्याप्रमाणे काम करावे. कामगारांना त्यांच्या हक्काचे वेतन व अन्य लाभ मिळावे यासाठीच मंडळ आहे. कामगारांच्या हिताच्या कायद्याची अंमलबजावणी हेतूपुरस्कर न करणाऱ्या आस्थापनांवर कायदेशीर कारवाई करा,असे निर्देश त्यांनी दिले. तसेच या कारवाई संदर्भात तसेच कामगारा संघटनांच्या विविध वैध मागण्यांबाबत सरकारी कामगार अधिकारी यांनी दर आठवड्याला अहवाल सादर करावा,असे निर्देशही दिले.

# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनास उपळी हायस्कूलचा दुसरा क्रमांक

**वडवणी । प्रतिनिधी**



वडवणी तालुक्यातील सर्व माध्यमिक व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये ५३ वे बाल वैज्ञानिक प्रदर्शन २०२५ २६ भरवण्यात आले होते या विज्ञान प्रदर्शनाचे नियोजन वडवणी तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी आदरणीय बाबासाहेबजी उजगरे, विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कन्या वडवणीचे केंद्रप्रमुख सैलानी शेख , सय्यद मॅडम तसेच महाराणी ताराबाई शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शोभा आंधळे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षक लोकमान्य उच्च माध्यमिक विद्यालयाचे श्री.पाटील सर व श्रीमती शेळके मॅडम या प्रदर्शनामध्ये उपळी हायस्कूल चा संघ सहभागी झाला होता. या संघाने हरित ऊर्जा ग्रीन एनर्जी या विषयावर मॉडेल तयार केले होते यामध्ये सौर ऊर्जेचा वापर करून आपण आपल्या घरातील एसी कुलर फॅन चा वापर ऊर्जा न वापरता कसा करता येईल सौर ऊर्जेच्या आधारे हे दाखवण्यात आले होते या प्रयोगास द्वितीय क्रमांक मिळाला. हा प्रयोग जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी पात्र झाला आहे. हा प्रयोग वर्ग नववीतील विद्यार्थी शेख हुजेर हनीफ या विद्यार्थ्याने बनवला त्याबरोबरच प्राथमिक गटातून इचके प्रेमराज बालाजी व कांबळे ज्ञानेश्वर हनुमंत या विद्यार्थ्यांना सुद्धा उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले यास मार्गदर्शन श्री गोरे प्रकाश रामकृष्ण व जाधव वसुवैभव वशिष्ठ या शिक्षकांनी केले. द्वितीय क्रमांक मिळाल्याबद्दल संस्थेचे कोषाध्यक्ष शेख मयूर सर व शाळेचे मुख्याध्यापक भागवतराव बडे सर यांनी विद्यार्थ्यासह मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी भाजपकडून नियोजन बैठका; इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्वीकारले जाणार : जिल्हा सरचिटणीस लांडे व बडे

**बीड । प्रतिनिधी**



आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीने बीड जिल्ह्यात संघटनात्मक तयारीला वेग दिला असून, या अनुषंगाने विविध तालुक्यांमध्ये नियोजन बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. या बैठकींच्या माध्यमातून आगामी निवडणुकांची रणनीती ठरविणे, संघटन अधिक मजबूत करणे तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली इच्छुक उमेदवारांची निवड करण्यात येणार असून, आगामी १ किंवा २ जानेवारी रोजी मा. ना. पंकजाताई मुंडे स्वतः जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेणार आहेत, अशी माहिती देण्यात आली आहे. तालुकानिहाय प्रभारी वडवणी, माजलगाव व धारूर या तालुक्यांसाठी जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, डॉ. योगेश क्षीरसागर, अक्षय मुंदडा व नवनाथ शिरोळे हे प्रभारी म्हणून काम पाहणार आहेत. परळी, अंबाजोगाई व केज या तालुक्यांसाठी जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, मा. बदामराव पंडित, सर्जेराव तांदळे व बाळराजे पवार यांच्याकडे प्रभारीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. बीड व गेवराई या तालुक्यांसाठी जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माधव निर्मळ, सतीश मुंडे व संजय आंधळे हे प्रभारी राहणार आहेत.

या सर्व नियोजन बैठका भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून, संघटना अधिक बळकट करून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपला भरीव यश मिळवून देण्याच्या दृष्टीने या बैठका महत्त्वाच्या ठरणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी आपल्या-आपल्या तालुक्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रभारींकडे आपले अर्ज व नावनोंदणी करावी. संघटन बळकटीकरण व योग्य उमेदवार निवडीच्या दृष्टीने ही प्रक्रिया राबवली जात असून, असे आवाहन जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे व जिल्हा सरचिटणीस रामदास बडे यांनी केले आहे.

### तालुकानिहाय नियोजन बैठकींचे वेळापत्रक

दिनांक : २६ डिसेंबर
वडवणी तालुका - सकाळी 10.30 वाजता
धारूर तालुका - दुपारी 12.30 वाजता
माजलगाव तालुका - दुपारी 3.00 वाजता

दिनांक : २७ डिसेंबर
केज तालुका - सकाळी 11.00 वाजता
अंबाजोगाई तालुका - दुपारी 1.00 वाजता
परळी तालुका - दुपारी 3.00 वाजता

दिनांक : २८ डिसेंबर
बीड तालुका - सकाळी 11.00 वाजता
गेवराई तालुका - दुपारी 1.00 वाजता

## जाहिर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १७८८/२०२५**
CNR No. MHBI02000039342025
**मेहरबी रहीम शेख व ईतर ५ वि. निरंक**

अर्जदार :-**१. मेहरबी रहीम शेख, वय-७९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. मोरगांव ता. जि. बीड, २. पाशा पि. रहीम शेख, वय-६२ वर्षे, धंदा-शेती, रा. हनुमान टेकडी असलफा व्हीजेज, मुंबई, ३. रूस्तम पि. रहीम, वय-६० वर्षे, धंदा-शेती, रा. मोरगांव, ता. जि. बीड, ४. बानुबी भ्र. गुलाब शेख, वय-५० वर्षे, धंदा-घरकाम, रा. मोहा ता. जामखेड जि. अहिल्यानगर ५. इनताजबी भ्र. गुलाब शेख, वय-६२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. मोहा ता. जामखेड जि. अहिल्यानगर ६. मसुंबी भ्र. गुलाब पठाण, वय-६१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. कर्झणी ता. जि. बीड**

विरुध्द निरंक

मागणी अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत

वरील अर्जदार क. १ ते ६ यांनी या न्यायालयात **रहीम पि. धोंडीभाई शेख** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत रहीम पि. धोंडीभाई शेख यांचा मृत्यु दिनांक २३/०५/२०२० रोजी झाला.** वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले व अर्जदार क. ४ ते ६ या मयताच्या विवाहित मुली आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत **रहीम पि. धोंडीभाई शेख** यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **प्रकरणातील पुढील तारीख ०६/०१/२०२६**

आज दिनांक २४ माहे डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **(मार्फत - ॲड. डी. एम. रोटे)**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) क. लिपीक** | **आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक सह दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ चे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १७९१ / २०२५**

अर्जदार - **१) केरू पि. रामभाऊ चौरे, वय-६३ वर्षे, धंदा - शेती, रा.खंडाळा, ता. जि. बीड. (२) नारायण पि. रामभाऊ चौरे, वय-५७ वर्षे, धंदा - नौकरी, रा.खंडाळा, ता. जि. बीड. ३) हरिचंद्र पि. रामभाऊ चौरे, वय-५३ वर्षे, धंदा - शेती व घरकाम, रा.खंडाळा, ता. जि. बीड. (४) लोचनाबाई भ्र. ज्योतीराम घुगे, वय-७० वर्षे, धंदा - घरकाम, रा. बोरफडी, ता. जि. बीड.**

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे **रामभाउ पि. मारूती चौरे** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **रामभाउ पि. मारूती चौरे, रा. खंडाळा, ता. जि. बीड हया दिनांक २२/०५/२०१७ रोजी खंडाळा, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ते ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताची पत्नी नामे तान्हाबाई भ्र. रामभाउ चौरे या दिनांक ०४/०३/२०२० रोजी मयत झालेल्या आहेत. मयताचे आई वडील हे ब-याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलच वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक ०९/०१/२०२६**

आज दिनांक २४ /१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**( ॲड. डी. एम. रोटे यांच्यामार्फत)**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) क. लिपीक** | **आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

## जाहिर प्रगटन

**मा.श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७८९ / २०२५**
**काझी शहेनाज वि. निरंक**

मागणी:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

**अर्जदार: १) काझी शहेनाज बेगम शमशोद्दीन, वय: ६८ वर्षे, धंदा: सेवानिवृत्त, रा. शहेंशाहनगर, ता. जि. बीड (२) सय्यद रफत सुलताना मीर अहमद अली, वय: ५७ वर्षे, धंदा: सेवानिवृत्त, रा. कारंजा रोड, बीड ता. जि. बीड ३) शेख कौसर फातेमा फारूक अहेमद, वय: २६ वर्षे, धंदा: शिक्षण, रा. वरील प्रमाणे ४) शेख माएरा फातेमा फारूक अहेमद, वय: १४ वर्षे, धंदा: शिक्षण, रा. अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क्र. २**

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे **शेख फारूक अहेमद उस्मान, राहणार शहेंशाहनगर, बीड, ता. जि. बीड हे दिनांक ०३/१०/२०२५ रोजी शहेंशाहनगर, बीड ता. जि. बीड येथे मयत** झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ व २ या मयताच्या पत्नी आहेत तसेच अर्जदार क्र. ३ व ४ या मयताच्या मुली आहेत. अर्जदार क. ४ ही अज्ञान असुन तिची अ.पा.क. आई अर्जदार क्र. २ ही आहे.

मयत नामे **शेख फारूक अहेमद उस्मान**, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत शेख फारूक अहेमद उस्मान यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख १३/०१/२०२५ आहे.**

आज दिनांक ०३/१२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**विधीज्ञ -श्री. रोटे डी. एम.**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) क. लिपीक** | **आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

## जाहिर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १८०१/२०२५**
CNR No. MHBI0200002025
**सोनाली मुकुंद वाघमोडे व ईतर १ वि. निरंक**

अर्जदार :-**१. सोनाली पि. मुकुंद शहागडकर (विवाहपुर्वीचे नावे), सोनाली भ्र. बाळासाहेब वाघमोडे, (विवाहनंतरचे नावे), वय-३६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. माडली नगर, नगर रोड, बीड ता. जि. बीड. २. अक्षरा पि. बाळासाहेब वाघमोडे, वय-१२ वर्षे, धंदा-शिक्षण, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क. १, रा. इंडिया बॅंक बस्ती, सिंहगड लॉन्स, बीड ता. जि. बीड ह. मु. माउली नगर, नगर रोड बीड ता. जि. बीड**

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ व २ यांनी या न्यायालयात बाळासाहेब पि. आन्नासाहेब वाघमोडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत बाळासाहेब पि. आन्नासाहेब वाघमोडे यांचा मृत्यु दिनांक १०/०९/२०२५ रोजी झाला.** वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ही मयताची मुलगी आहे. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत **बाळासाहेब पि. आन्नासाहेब वाघमोडे** यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक मराठवाडा पत्र मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्रकरणातील पुढील तारीख ०८/०१/२०२६**

आज दिनांक २४ माहे डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **(मार्फत - ॲड. डी. एम. रोटे)**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) क. लिपीक** | **आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक सह दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस. एच. पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०१३/२०२५**
**संजिवनी विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **भीमराव पि. पुजांजी बेदरे हे दिनांक २१/०७/२०२३ रोजी रा. गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार **१. संजीवनी भ्र. भिमराव बेदरे वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. गजानन नगर गेवराई ता. गेवराई जि. बीड २. प्रकाश पि. भीमराव बेदरे वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा. गजानन नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत भीमराव पि. पुजांजी बेदरे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २४/१२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २७/०१/२०२६

**(मार्फत ॲड. दाभाडे के.व्ही. गेवराई)**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) क. लिपीक** | **आदेशावरून (स्वाक्षरीत) सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर गेवराई**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १०८/२०२५**
भगवान लक्ष्म खंदारे विरुध्द ग्रा.पं.कार्या. कारेगव्हाण

पहा,

१. **भगवान लक्ष्मण खंदारे, रा.कारेगव्हाण, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत **लक्ष्मण गोपिनाथ खंदारे यांचा दिनांक ११/११/२०१७ रोजी** मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यू नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **कारेगव्हाण ता. बीड** येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **कारेगव्हाण ता. बीड** येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १५/०१/२०२६ ही आहे.**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १०६/२०२५**
रहेमत कासम पठाण विरुध्द ग्रा.पं.कार्या. सावरगाव घाट

पहा,

१. **रहेमत कासम पठाण, रा.सावरगाव घाट, ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत **पठाण कासम अमीर यांचा दिनांक ०२/०२/२००४ रोजी** मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यू नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **सावरगाव घाट ता. बीड** येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **सावरगाव घाट ता. जि. बीड** येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १५/०१/२०२६ ही आहे.**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १०७/२०२५**
बंडु महारूद्र कुलकर्णी विरुध्द ग्रा.पं.कार्या.हिंगणी(बु.)

पहा,

१. **बंडु महारूद्र कुलकर्णी, रा.हिंगणी(बु.), ता.जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत **महारूद्र डिगांबर कुलकर्णी यांचा दिनांक १५/१०/१९७२ रोजी** मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यू नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **हिंगणी (बु.) ता. बीड** येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे **हिंगणी(बु.) ता. जि. बीड** येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/१२/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. **सदर प्रकरणात पुढील तारीख १५/०१/२०२६ ही आहे.**

**शिक्का** | **(स्वाक्षरीत) तहसिलदार, बीड.**

## जाहीर प्रगटन

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED**
**Under the Consumer Protection Act, 2019**
**CONSUMER CASE NO. DC/470/CC/789/2024**

**Petitioner / Appellant - SHYAMSUNDAR S/O. BABANRAO SHINDE**

**Versus**

**Opposite Party / Respondent Name: - DAYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD.**

**To. Opposite Party / Respondent(s)**

**1. DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. R/O. HEAD BRANCH- DNYANRADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED. TQ. BEED.. MAHARASHTRA BEED-**

**2. YASHVANT S/O. VASANTRAO KULKARNI, VICE-CHAIRMAN, DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. R/O. HEAD BRANCH- DNYANRADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED. TQ BEED.. MAHARASHTRA BEED-**

**3. SANTOSH VAREKAR, BRANCH MANAGER. DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BRANCH- CANAL ROAD, BEED, TQ. BEED.. MAHARASHTRA BEED**

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे.यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ३०/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वंता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जवाब. पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक १८/१२/२०२५ | **(स्वाक्षरीत)**
ठिकाण - बीड | **शिक्का** | **प्रबंधक जिल्हा ग्राहक तक्रार, निवारण आयोग, बीड.**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • गुरूवार, दि. २५ डिसेंबर २०२५ • पान ४

## तमाशा सुरु असताना राडा, एकाला सहा जणांनी घेरलं, स्टेजवरच बेदम मारहाण; बीडमध्ये खळबळ



बीड । प्रतिनिधी

बीडच्या केज तालुक्यातील सोनीगावजवळ येथे म्हसोबा यात्रेच्यानिमित्त तमाशाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याचं पाहावयास मिळालं. मात्र, रात्री ११ वाजेच्या सुमारास हा कार्यक्रम सुरू असताना अचानक सुधीर प्रकाश वैरागे नावाच्या तरूणाला एका टोळक्याकडून लाकडी काठ्या आणि लाथा बुक्क्याने बेदम मारहाण करण्यात आली असल्याची घटना समोर आली आहे. या घटनेचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. व्हिडिओमध्ये दिसत आहे की, या तरुणालातमाशाच्या स्टेजवरच मारहाण करत असल्याचं दिसत आहे. या घटनेमध्ये तरूण गंभीररित्या जखमी झाला असून अंबाजोगाई येथील स्वाराती रूग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या तरुणाच्या नातेवाईकांनी पोलिसांत धाव घेतली. मात्र, पोलिसांकडून अद्याप कोणत्याही प्रकारे कारवाई केली गेली नसल्याचे खुद्द उपचार घेत असलेल्या तरुणाने प्रतिकिया दिली आहे. या घटनेचं नेमकं काय कारण आहे? हे अद्याप समोर आलेलं नाही. याप्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याचं सांगण्यात आलं आहे. या प्रकरणात नेमकं कोण पोलिसांवर दबाव टाकत आहेत? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

# मतदारांनी घडवला इतिहास; प्रभाग क्र. 7 मध्ये 50 वर्षांची परंपरा मोडून बदलाचा कौल

### पाटांगणकर महाराजांच्या आशीर्वादाने प्रचार व आभार दौऱ्याचा शुभारंभ; जगदीश गुरखुदे व सागर देशपांडे यांनी रॅली काढत मानले आभार

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्र. ७ मधील सजग, जागरूक व विकासाभिमुख मतदारांनी ऐतिहासिक निर्णय घेत तब्बल ५० वर्षांपासून एकाच घरातील नगरसेवकांची सुरू असलेली परंपरा मोडीत काढली आणि भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांना स्पष्ट बहुमत देत



बदलाचा ठाम कौल दिला आहे.

या निवडणुकीत भाजपचे अनुभवी व लोकप्रिय नगरसेवक जगदीश गुरखुदे यांनी ८३६ मतांच्या भक्कम आघाडीने दणदणीत विजय मिळवला. विशेष म्हणजे याआधी प्रत्येक निवडणुकीत एकट्याने निवडून येणारे गुरखुदे यावेळी नवख्या पण जनतेशी थेट जोडलेल्या सौ. भाग्यश्री सागर देशपांडे यांना निवडून आणण्यात यशस्वी ठरले. दीर्घकाळ चालत आलेली राजकीय मक्तेदारी नाकारून मतदारांनी व्यक्ती नव्हे तर कार्य, विकास आणि विश्वासाला प्राधान्य दिले, हे या निकालातून स्पष्ट झाले आहे.

निवडणूक प्रचाराचा शुभारंभ तसेच विजयानंतरचा आभार दौऱ्याचा प्रारंभ पाटांगणकर महाराजांच्या आशीर्वादाने करण्यात आला होता. याच ठिकाणाहून प्रचार व जनसंपर्काची सुरुवात झाल्याने या विजयाला भावनिक आणि आध्यात्मिक अधिष्ठान लाभले, अशी भावना कार्यकर्ते व नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या विजयामागे स्थानिक नेतृत्वासोबतच भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन व भक्कम पाठबळही लाभले. प्रचारादरम्यान मा. ना. मंत्री लोकनेत्या पंकजाताईसाहेब मुंडे, भाजपचे युवा ▶▶ उर्वरित पान २ वर

## दिव्यांगाच्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी सर्व कार्यान्वयीन यंत्रणांची बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

दिव्यांग कल्याणाच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क व अधिकार अधिनियम २०१६ नुसार कार्यवाही करण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख यांची बैठक दिनांक २३/१२/२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे पार पडली. सदर बैठकीमध्ये श्री. विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी, बीड व श्री. जितीन रहमान, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा




परिषद, बीड यांनी दिव्यांग व्यक्त शासकीय योजनेचे लाभ मिळवून देण्यासाठी सर्व विभाग प्रमुखांना मार्गदर्शन केले. दिव्यांगासाठी सर्व शासकीय इमारती, संकेतस्थळे व इतर अनुषंगीक सोयी सुविधा सुगम्य करणे आवश्यक असल्याचे नमुद केले. शासकीय आस्थापनेवरील दिव्यांग प्रमाणपत्रा ध लाभ घेतलेले अधिकारी व कर्मचारी यांना णऊखऊ बंधनकारक करण्यात आल्याचे देखील कळविण्यात आले. शिवाय संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना येणाऱ्या अडी अडचणी सोडविण्याबाबत सर्व उपविभागीय अधिकारी व संबंधित तहसीलदार यांना सुचना देण्यात आल्या. जिल्हा शल्य चिकित्सक व अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांना दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप करणे व णऊखऊ कार्ड उपलब्ध करून देणे बाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. स्थानिक ▶▶ उर्वरित पान २ वर

## महेश सहकारी साखर कारखान्यावर शेतकरी मेळाव्याचे आयोजन: माजी आ.भीमराव धोंडे

● शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील महेश सहकारी साखर कारखान्याच्या वतीने तालुक्यातील व परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी योग्य ऊस व्यवस्थापन या विषयावर भव्य मार्गदर्शनपर शेतकरी मेळाव्याचे आयोजन शुक्रवार दि. २६ रोजी सकाळी ११ वा. महेश साखर कारखान्याच्या कार्यस्थळी



करण्यात आले आहे. या मेळाव्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले आहे. या मेळाव्यात ऊस उत्पादन वाढ, उत्पादन खर्चात बचत, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमास कारखान्याचे चेअरमन, सर्व संचालक मंडळ, पदाधिकारी, ACFI चे वरिष्ठ अधिकारी, IICareFoundation चे प्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांचे आगमन होणार असून त्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची विधिवत सुरुवात करण्यात येणार आहे.त्यानंतर उपस्थित शेतकरी बांधवांचे स्वागत करण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे संचालक करणार असून कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड मधील मेडिकल उद्योजक बाळासाहेब ढोकणे यांना पितृशोक



● ज्येष्ठ नागरिक बन्सी ढोकणे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

बीड मधील प्रसिद्ध मेडिकल उद्योजक बाळासाहेब ढोकणे यांचे वडील तथा बीड तालुक्यातील देवी बाबुळगाव येथील ज्येष्ठ नागरिक बन्सी हरिबा ढोकणे (वय ८०) यांचे काल बुधवार दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ९.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. ते वैद्यकीय उद्योगातील बाळासाहेब ढोकणे यांचे वडील होते. या बाबत अधिक माहिती अशी की बीड मधील प्रसिद्ध मेडिकल उद्योजक बाळासाहेब ढोकणे यांचे वडील तथा बीड तालुक्यातील देवी बाभूळगाव येथील रहिवासी असलेले जेष्ठ नागरिक बन्सी हरिबा ढोकणे हे शांत संयमी आणि मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या मनावर साधूसंत आणि फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी आपल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## डॉक्टरी पेशाला जागणारे 'देवमाणूस' डॉ. अक्षय खरवडे

### डॉ. अक्षय खरवडे साहेबांच्या भव्य निरोप समारंभाच्या कार्यक्रमास गावकऱ्यांची लक्षणीय उपस्थिति

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वर्षानुवर्ष आणेक डॉक्टर आले आणी गेले. पैकी आणेक डॉक्टरांनी या ठिकाणी उत्तम रित्या रुग्ण सेवा देत आपला कार्यकाळ गुण्यागोविंदाने पुर्ण केला. तर आणेक डॉक्टरांना येथील काही विघ्न संतोषींनी एकनाऐक विघ्न आणत कार्यकाळ पुर्ण होण्यापुर्वीच येथील पदभार सोडन्यास भाग पाढले. परंतु डॉक्टर अक्षय खरवडे साहेब या ठिकाणी रुजु झाल्या पासुन नित्यनियमाने प्रतेक येणा-या रुग्णाला कुटुंबातील सदस्या प्रमाणे आपुलकी पूर्वक रुग्ण सेवा देण्या



बरोबरच या ठिकाणी रुग्ण सेवेत विघ्न आणणा-या विघ्न संतोषींना देखील आपलीच माणसे समजुन हाताळत आसल्याने डॉक्टर अक्षय खरवडे साहेबांची डॉक्टरी पेशातील 'देवपण', जपणारे देवमाणुस आसल्याची व्याख्याता शब्दातुन या ठिकाणी उपस्थित मान्यवर बांधवांनी आपल्या विचारातुन व्यक्त केली. डॉक्टर खरवडे साहेब पुढील वैधकिय शिक्षणासाठी जात आहे याचा आनंद तर त्यांच्या चेह-यावर उपस्थितांना जानवत तर होताच पण या ठिकाणची अर्धवट रुग्ण सेवा सोडुन जात आसल्याची खंत सुध्दा त्यांच्या कडे पहातांना दिसुन आली. डॉक्टर अक्षय खरवडे साहेबांनी निरोप समारंभ कार्यक्रमा निम्मीत कृतज्ञता व्येक्त करतांना सांगीतले की तलवाडा या ठिकाणी रुग्ण सेवा करत आसतांना येथील विविध शेत्रातील पदाधिकारी, या गावातील नेते मंडळी, आरोग्य केंद्रातील माझे सर्व सहकारी, पत्रकार बांधव, गावकरी यांनी सामाज्यास्याने मला या ठिकाणी रुग्ण सेवा करण्यास संधी दिली त्या बद्दल मी सर्वांचा आभारी आहे, माझे ▶▶ उर्वरित पान २ वर

## सीमेवर देशासाठी लढणाऱ्या जवानाच्या घरावर दिवसाढवळ्या डल्ला



कडा । प्रतिनिधी

सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानाच्या घरातच दिवसाढवळ्या चोरी झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. आष्टी तालुक्यातील कापशी येथील जवान महादेव गोल्हार यांच्या घरावर ▶▶ उर्वरित पान २ वर

## भीक मागायला लावणाऱ्या चिमुकलीला मिळाले बालगृह

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील गढी येथे ६ वर्षांच्या चिमुकलीला तिचीच आई रोज मारहाण करत होती. तिला रस्त्यावर भीक मागायला लावत होती. ही माहिती संवेदनशील नागरिकांनी जिल्हा चाईल्ड हेल्पलाईनच्या १०९८ क्रमांकावर मिळाल्यानंतर कारवाई करीत या चिमुकलीला बालगृहात पाठवण्यात आले आहे. चाईल्ड हेल्पलाईनच्या पथकाने कारवाई केली. चिमुकलीला आता सहारा अनाथाश्रमात रवाना केले आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मनोज ससे, जिल्हा बालसंरक्षण अधिकारी मंगेश जाधव, जिल्हा प्रकल्प समन्वयक अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने घटनास्थळी भेट दिली असता चिमुकली दिवसा आणि रात्री रस्त्यावर भीक मागत होती. शिवाय उघड्यावर ▶▶ उर्वरित पान २

## 'तरुणाच्या घरात घुसून तरुणीचा गोंधळ'; प्रेमसंबंधावरून घडला प्रकार

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील एका गावात प्रेमसंबंध तुटल्यानंतर एका तरुणीने मित्राच्या घरात घुसून गैरवर्तन केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी संबंधित तरुणीविरोधात युसूफवडगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली आहे.

ढाकेफळ (ता.केज) येथील एक तरुण लातूर येथे शासकीय सेवेत कार्यरत आहे. त्याचे व त्याच गावातील एका तरुणीचे पूर्वी मैत्रीपूर्ण संबंध होते. नातेवाइकांच्या मध्यस्थीने दोघांमधील संबंध संपुष्टात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. १४ डिसेंबरला तरुणाच्या लहान भावाच्या लग्नाची सुपारी फोडण्याचा कार्यक्रम सुरू असताना संबंधित तरुणी अचानक त्याच्या घरात आली व गोंधळ घातला. उपस्थितांनी तिची समजून काढली. नातेवाइकांच्या उपस्थितीत दोघांमधील संबंध पूर्णतः संपल्याचे लेखी शपथपत्र तयार करण्यात आले. मात्र, २२ डिसेंबरला रात्री साडेआठच्या सुमारास ती पुन्हा तरुणाच्या घरात घुसली व दरवाजावर थुंकल्याचा आरोप आहे. तरुणाच्या वडिलांनी जाब विचारला असता तिने शिवीगाळ करत घर सोडणार नसल्याची धमकी दिली. गंभीर परिणामांची भाषा करत ती तेथून निघून गेली.

नोटरी शपथपत्रावर प्रश्नचिन्ह- दोघांमधील मैत्री संपुष्टात आल्याचे शपथपत्र नातेवाइकांच्या दबावातून घेतले गेले असावे, अशी चर्चा आहे. भविष्यात या प्रकरणातून काही अनुचित घटना घडल्यास नोटरी व साक्षीदारांचीही चौकशी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तरुणाच्या वडिलांनी दिली तक्रार- तरुणाच्या वडिलांच्या तक्रारीवरून युसूफवडगाव पोलिस ठाण्यात संशयित तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. प्रभारी सहायक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे, हेडकॉन्स्टेबल केशव खाडे तपास करीत आहेत.





*तलवाडा प्राथमिक अरोग्य केंद्रातील कर्तव्यदक्ष अधिकारी डॉक्टर अक्षय खरवडे सर हे पुढील वैधकिय शिक्षणासाठी जात आसल्यामुळे निरोप समारंभ निमित्त त्यांचा यथोचित सत्कार करुन शुभेच्छा देतांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर, जयदेव शिगणे, बाळू डहाळे, पत्रकार सुमेध करडे, व शेख आतिखभाई*

# आष्टीतील राष्ट्रीयीकृत बँकेत 'इन्शुरन्सशिवाय कर्ज नाही'चा फंडा;

## मॅनेजरचा उघड भ्रष्ट कारभार, तात्काळ बदलीची ठोस मागणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील एका राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये मॅनेजरकडून सुरू असलेला मनमानी, ग्राहकविरोधी व संशयास्पद आर्थिक कारभार चव्हाट्यावर आला असून, या प्रकारामुळे सामान्य नागरिक अक्षरशः वेठीस धरले गेले आहेत. बँकेचे मॅनेजर श्री. गोडबोले यांची तात्काळ बदली करून चौकशी करावी, अशी ठोस आणि आक्रमक मागणी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने केली आहे.

संघाने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे दिलेल्या निवेदनात गंभीर आरोप केले आहेत. त्यानुसार,सि एम ई जी पी व विविध योजनांतून कर्ज मंजुरीसाठी बेकायदेशीर अट घालण्यात येत असून, बँकेकडून हेल्थ इन्शुरन्स काढल्याशिवाय कर्ज फाइल पुढे सरकणार नाही असा अलिखित नियम राबवला जात आहे. ही सक्ती झाल्यानंतरही कर्जदारांची फाइल बीड येथील आरएसी विभागात मुद्दाम त्रुटी काढून अडवली जाते किंवा परत पाठवली जाते.

या बेकायदेशीर फंड्यामुळे कर्जदारांची फसवणूक होत असून, दोन ते तीन महिने कर्ज प्रक्रिया रखडते. वारंवार बँकेच्या फेऱ्या, अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे आणि आर्थिक तणाव यामुळे ग्राहक हतबल झाले आहेत. सरकारी बँकेत अशा प्रकारचा कारभार सुरू असणे ही गंभीर बाब असून, बँकेच्या विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याबाबत आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे. हा प्रकार म्हणजे थेट अधिकाराचा गैरवापर आहे. ग्राहकांची लूट, कर्मचाऱ्यांवर दबाव आणि अप्रत्यक्ष भ्रष्टाचाराला संरक्षण देणारा हा कारभार आहे. अशा अधिकाऱ्यांना तात्काळ हटवले नाही, तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. ▶▶ उर्वरित पान २ वर

**● बँक मॅनेजरवर नेमके आरोप काय?**

**कर्ज मंजुरीपूर्वी सक्तीने हेल्थ इन्शुरन्स पॉलिसी काढायला लावणे. इन्शुरन्सशिवाय कर्ज फाइल स्वीकारण्यास नकार. कर्ज फाइल मुद्दाम बीड आरएसी विभागात अडकवणे. दोन-तीन महिने कर्ज प्रक्रिया रखडवणे ग्राहकांना वारंवार हेलपाटे मारण्यास भाग पाडणे. सरकारी बँकेच्या नियमांची खुलेआम पायमल्ली**

**● युवा पत्रकार संघाच्या ठोस मागण्या**

**मॅनेजर गोडबोले यांची तात्काळ बदली संपूर्ण कर्ज प्रकरणांची स्वतंत्र चौकशी इन्शुरन्स सक्तीप्रकरणी दोषींवर कारवाई ग्राहकांना दिलासा देणारी त्वरित व्यवस्थाभविष्यात अशी मनमानी रोखण्यासाठी नियंत्रण यंत्रणा हवी आहे.**